# दैनिक लोकविजय

संस्थापक : कै. पां. ग. रांजणीकर

(वर्ष ६३ वे अंक ५८) पोस्टाचा परवाना नं. / अे / आर / ए.जी.डी. - ०७ / २०२३ छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार, दि.१९ फेब्रुवारी २०२४ (पाने ४) (किंमत २ रुपये)


## मराठ्यांना ओबीसीतूनच आरक्षण द्या; मनोज जरांगे यांचा राज्य सरकारला पुन्हा इशारा

जालना दि.१८ (प्रतिनिधी)- मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी मराठ्यांना ओबीसीतूनच आरक्षण हवे. तसेच सरकारने २० तारखेला आरक्षण दिले तरी मराठ्यांना ओबीसीतूनच आरक्षण देण्यासाठी आमचे आंदोलन सुरू राहील असा स्पष्ट इशारा मनोज जारांगे यांनी राज्य सरकारला दिला आहे. जरांगे पाटील यांच्या उपोषणाचा आज नववा दिवस आहे. आज सकाळी वैद्यकीय पथकाने त्यांचा बीपी तपासला. त्यांची प्रकृती सध्या स्थिर असून त्यांनी प्रसार माध्यमांशी संवाद साधला आहे. यावेळी जरांगे म्हणाले, 'स'ग्या सोयऱ्याची सरकारने अंमलबजावणी केली पाहिजे. ज्यांची नोंद मिळाली त्या नोंदी आधारे सग्या सोयऱ्यांना आरक्षण द्यावे. २०, २१ तारखेला सग्या सोयऱ्याची अध्यादेशाची अंमलबजावणी करावी. जर अंमलबजावणी केली नाही. सगे सोयऱ्याची भूमिका घेतली नाही तर लगेच पत्रकार परिषद घेऊन आंदोलनाची पुढची दिशा ठरवणार आहे'', असा इशारा मनोज जरांगे यांनी दिला. तसेच ''मराठ्यांना ओबीसीतून आरक्षण पाहिजे. कारण मराठे ओबीसीमध्येच आहेत. शंभर दोनशे लोकांसाठी मराठ्यांचे वाटोळं होईल. सहा करोड मराठ्यांची ओबीसीतून आरक्षण देण्याची मागणी आहे. सरकारने २० तारखेला आरक्षण दिले तरी मराठ्यांना ओबीसीतूनच आरक्षण देण्यासाठी आमचे आंदोलन सुरू राहील'', असं मनोज जरांगे यावेळी म्हणाले.

# भाजपला ३७० पार यश मिळवावेच लागेल

## भाजपच्या राष्ट्रीय अधिवेशनात पंतप्रधान मोदींचे नेत्यांना संबोधन

नवी दिल्ली दि.१८ (वृत्तसंस्था)- आज विरोधी पक्षाचे नेतेही एनडीए सरकार ४०० च्या विरोधात घोषणा देत आहेत. आणि एनडीएला ४०० चा टप्पा पार करण्यासाठी भाजपला ३७० चा टप्पा पार करावा लागेल. असं पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले. भारतीय जनता पक्षाच्या दोन दिवसीय राष्ट्रीय अधिवेशनाचा रविवारी समारोप झाला. दिल्लीतील प्रगती मैदानावर असलेल्या भारत मंडपममध्ये याचे आयोजन करण्यात आले होते. समारोपाच्या सत्राला पंतप्रधान मोदींनी उपस्थितांना संबोधित केले.

गेल्या १० वर्षात भारताने जी गती गाठली आहे, मोठी उद्दिष्टे साध्य करण्याचे धाडस दाखवले आहे, ते अभूतपूर्व असल्याचे पंतप्रधान मोदी म्हणाले. भारताने आज प्रत्येक क्षेत्रात जी शिखरे गाठली आहेत, त्यामुळे प्रत्येक देशवासीयांना एका मोठ्या संकल्पाने एकत्र केले आहे. हा विकसित भारताचा संकल्प आहे. आता देश ना छोटी स्वप्ने पाहू शकतो, ना छोटे संकल्प करू शकतो. स्वप्नेही मोठी असतील आणि संकल्पही प्रचंड असतील. भारताचा विकास करायचा आहे, हे आमचे स्वप्न आणि संकल्पही आहे. ते म्हणाले, 'आज विरोधी पक्षाचे नेतेही एनडीए सरकार ४०० च्या विरोधात घोषणा देत आहेत. एनडीएला ४०० चा टप्पा पार करण्यासाठी भाजपला ३७० चा टप्पा पार करावा लागेल. आम्ही छत्रपती शिवरायांना मानणारे लोक आहोत. छत्रपती शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक झाला तेव्हा ते म्हणाले नव्हते की, सत्ता मिळाली तर उपभोग घेऊया. त्याने आपले ध्येय चालू ठेवले. मी माझ्या स्वतःच्या आनंदासाठी आणि गौरवासाठी जगणारी व्यक्ती नाही. मी भाजप सरकारची तिसरी



टर्म सत्ता उपभोगण्यासाठी मागत नाही. मी देशासाठी संकल्प घेऊन बाहेर पडलेली व्यक्ती आहे.

आगामी लोकसभा निवडणुकीच्या संदर्भात पंतप्रधान मोदी म्हणाले, 'भाजप कार्यकर्ते वर्षातील प्रत्येक दिवशी, २४ तास देशाची सेवा करण्यासाठी काहीतरी करत राहतात. पण आता पुढचे १०० दिवस नव्या ऊर्जेने, नव्या उमेदीने, नव्या उमेदीने, नव्या आत्मविश्वासाने आणि नव्या उमेदीने काम करायचे आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले की, आज १८ फेब्रुवारी आहे आणि या काळात १८ वर्षांचे झालेले तरुण देशाच्या १८व्या लोकसभेसाठी निवडून येणार आहेत. पुढील १०० दिवस आपण सर्वांनी मिळून काम करायचे आहे. प्रत्येक नवीन मतदार, प्रत्येक लाभार्थी, प्रत्येक वर्ग, समाज, पंथ, परंपरा या सर्वांपर्यंत पोहोचले पाहिजे. आपण सर्वांचा विश्वास संपादन केला पाहिजे. सर्वांचे प्रयत्न होतील तेव्हा भाजपला जास्तीत जास्त जागा मिळून देशसेवा होईल. या दोन दिवसात जी चर्चा झाली. या गोष्टी देशाच्या उज्ज्वल भविष्यासाठी आपला संकल्प मजबूत करतात.

# सोनिया गांधींचे लक्ष्य केवळ राहुल गांधींना पंतप्रधान करणे आहे

## केंद्रिय गृहमंत्री अमित शाहांचा काँग्रेसवर हल्लाबोल

नवी दिल्ली दि.१८ (वृत्तसंस्था)- दिल्लीत भाजपच्या राष्ट्रीय महाअधिवेशनात गृहमंत्री अमित शाह यांनी विरोधकांवर जोरदार हल्लाबोल केला आहे, विरोधी पक्षावर निशाणा साधत अमित शाह म्हणाले की, या पक्षांच्या नेत्यांचा उद्देश आपल्या मुलाला मुख्यमंत्री किंवा पंतप्रधान बनवणे आहे. मुलांचे कल्याण हेच ध्येय असेल तर देशाचे कल्याण कसे होणार? देशातील तरुणांना विरोधी पक्षांमध्ये पुढे जाऊ दिले जात नाही. असा आरोप अमित शाह यांनी केला आहे.

विरोधकांवर हल्लाबोल करताना अमित शाह म्हणाले की, Iण्क्ष् आघाडीमध्ये सहभागी असलेले सर्व पक्ष घोटाळ्यांमध्ये



बुडलेले आहेत. आम आदमी पक्षानेही दिल्लीत अनेक घोटाळे केले. पांडव आणि कौरवांप्रमाणेच लोकसभा निवडणुकीपूर्वी दोन कॅम्प निर्माण झाल्या आहेत. मोदींच्या नेतृत्वाखाली पहिला कॅम्प म्हणजे एनडीए आघाडी, राष्ट्र प्रथम हा आपल्या आघाडीचा आधार आहे. तर Iण्क्ष् आघाडी घराणेशाहीचे पालनपोषण करते. पुढील निवडणूक विकास आघाडी विरुद्ध घराणेशाही आघाडी यांच्यात होणार आहे.

गृहमंत्री म्हणाले, सोनिया गांधींचे लक्ष्य राहुल गांधींना पंतप्रधान बनवणे, शरद पवारांचे लक्ष्य आपल्या मुलीला मुख्यमंत्री बनवणे, उद्धव ठाकरेंचे लक्ष्य आपल्या मुलाला मुख्यमंत्री बनवणे, लालू यादव यांचे लक्ष्य आपल्या मुलाला मुख्यमंत्री बनवणे आणि मुलायम यांचे उद्दिष्ट आहे. आपल्या मुलाला मुख्यमंत्री बनवणे हे सिंह यादव यांचे उद्दिष्ट आहे. ते म्हणाले की, भाजप जर कुटुंबाभिमुख पक्ष असता तर चहा विकणाऱ्याचा मुलगा कधीच पंतप्रधान झाला नसता. लोकशाहीत सर्वांना समान संधी मिळणे महत्त्वाचे आहे.

## शिंदे हे पूर्णपणे भाजपचे नोकर झालेत; मुख्यमंत्र्यांवर संजय राऊत टीका

मुंबई दि.१८ (प्रतिनिधी)- शिवसेनेच्या आधिवेशनात मोदींना पंतप्रधान करण्याचा आणि भाजपाचे अभिनंदनाचा ठराव मंजूर होतोष्ठ ही कसली लाचारी. जर आज बाळासाहेब ठाकरे आज असते तर त्यांनी यांचा कडेलोट केला असता, अशा शब्दांत ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर टीकास्त्र डागले आहे. तसेच एकनाथ शिंदे हे पूर्णपणे भाजपाचे नोकर झाले आहेत, त्यांच्या सर्वांच्या डोक्यावर परिणाम झाला आहे अशी टीकाही संजय राऊतांनी केली आहे.

शिंदेंच्या वक्तव्यावर संजय राऊतांचे प्रत्युत्तर कोल्हापुरात झालेल्या शिवसेनेच्या महाधिवेशनात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी उद्धव ठाकरे यांनी परिवारातील व्यक्तीमुळे अडचणीत आल्यावर दिल्लीला दिलेला युतीचा शब्द पाळला नाही.

मोदींना भेटून बाहेर आल्यावर घामाने ओले झाले होते. तेव्हा दोन ग्लास पाणी प्यायले, असे विधान केले होते. त्यांच्या याच विधानावर संजय राऊत यांनी प्रतिक्रिया दिली आहे.

# राजकारणासाठी व्यक्तिगत नाते तोडू नये

## काँग्रेसमधील 'काका-पुतण्या'च्या नात्यावर जयंत पाटलांचं विधान!

लातूर दि.१८ (प्रतिनिधी)- गेल्या काही वर्षांत राज्यात काका-पुतण्यांचं राजकारण अवघ्या महाराष्ट्राने पाहिलं. अजित पवारांनी राष्ट्रवादीत बंड केल्यानंतर या काका-पुतण्याच्या राजकारणाची चर्चा चालू झाली. यावरूनच, शरद पवार गटाचे नेते जयंत पाटील यांनी यावरून टीका केली आहे. आज राज्याचे माजी मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांच्या पुतळ्याच्या अनावरणाच्या कार्यक्रमात बोलत होते.

'एखाद्यावर संताप व्यक्त



करण्यासाठी खालच्या दर्जाला राजकारण गेलं आहे. त्यामुळे आता कुठेतरी थांबलेलं बरं असं अनेकांना वाटतं. किती गुंडगिरी महाराष्ट्रातील राजकारणात शिरते आहे, याची अनेक उदाहरणं गेल्या काही महिन्यांत दिसायला लागली आहेत. माझी लातूरकरांना विनंती आहे की, या लातूरने महाराष्ट्रातील काँग्रेसला सतत तेज देण्याचं काम केलं आहे. काँग्रेस महाराष्ट्रात ठामपणे अस्तित्वात आहे, हे अनेकवेळा या लातूरने सिद्ध करून दाखवलं आहे. लातूरकरांवर ही जबाबदारी आहे की आपल्या महाराष्ट्रात ज्या संस्कृतीत वाढलो, जी संस्कृती विलास देशमुखांनी दाखवली, ती संस्कृती लोप पावत आहे. या लोप पावणाऱ्या या संस्कृतीला टिकवण्याचं काम लातूरकरांचं आहे',असं भावनिक आवाहन जयंत पाटलांनी केलं.

'काँग्रेसचं बरं आहे काका-पुतण्याचं नातं धार्जिणं दिसत आहे. दिलीप देशमुख उत्तमपणाने नेतृत्व करत आहेत. अमित यांच्यासह सर्वांचे संबंध मधूर आहेत. राजकारणात कसंही कोणी वागलं तरी चालतं. पण राजकारणासाठी व्यक्तिगत नातं तोडण्याची भूमिका कोणी घेता कामा नये. आता त्याही गोष्टी व्हायला लागल्या आहेत', असा अप्रत्यक्ष टोलाही त्यांनी लगावला.

## शेतकरी आंदोलनाचा सहवा दिवस; हरियाणात २ शेतकरी नेत्यांना अटक

अंबाला दि.१८ (वृत्तसंस्था)- शेतकरी आंदोलनाचा आज, रविवार (१८ फेब्रुवारी) सहावा दिवस आहे. दिल्ली मोर्चासाठी निघालेले शेतकरी पंजाब-हरियाणाच्या शंभू सीमेवर अडकले आहेत. या आंदोलनात आतापर्यंत एका शेतकरी व उपनिरीक्षकाचा हृदयविकाराच्या झटक्याने मृत्यू झाला आहे. संध्याकाळी चंदीगडमध्ये केंद्र-शेतकऱ्यांची बैठक होणार आहे. हा चौथा संवाद आहे. यापूर्वी ३ बैठका (८, १२ आणि १५ फेब्रुवारी) अनिर्णायक होत्या. या बैठकीत निर्णय न झाल्यास शेतकऱ्यांनी दिल्लीकडे मोर्चा काढण्याची घोषणा केली आहे.

हरियाणातील भारतीय किसान युनियनने (चढूनी ग्रुप) कुरुक्षेत्रात दुपारी किसान-खाप पंचायत बोलावली आहे. येथून हरियाणात आंदोलन सुरू करण्याची घोषणा केली जाईल. १९ फेब्रुवारीच्या मध्यरात्री १२ पर्यंत ७ जिल्ह्यांमध्ये इंटरनेट बंद राहणार आहे. या जिल्ह्यांमध्ये अंबाला, कुरुक्षेत्र, कैथल, जिंद, हिस्सार, फतेहाबाद आणि सिरसा यांचा समावेश आहे.

आज पंजाबमध्ये सर्व टोलनाके मोफत असतील. येथे भारतीय किसान युनियन उगराहांशी संबंधित शेतकरी संपावर बसले आहेत. पंजाब भाजपचे अध्यक्ष सुनील जाखड, माजी मुख्यमंत्री कॅप्टन अमरिंदर सिंग आणि केवल धिल्लन यांच्या घरीही त्यांनी निदर्शने केली आहेत.

# हिंमत असेल तर मुख्यमंत्री पदाचा राजीनामा द्या, मी तुमच्या मतदारसंघातून निवडणूक लढविण्यास तयार

## आदित्य ठाकरेंचे एकनाथ शिंदेंना आव्हान

ठाणे दि.१८ (प्रतिनिधी)- सर्वेक्षणात आपण पहिल्या क्रमांकावर आहोत. त्यामुळे हे महापालिकांच्या निवडणुका घेण्याची हिंमत दाखवित नाहीत. हिंमत असेल तर मुख्यमंत्री पदाचा राजीनामा द्या. मी तुमच्या मतदारसंघातून लढायला तयार आहे असे आव्हान ठाकरे गटाचे नेते आदित्य ठाकरे यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना दिले. मला पद नकोय, मी माझ्या महाराष्ट्रासाठी लढतो आहे, असेही ते म्हणाले. आदित्य ठाकरे हे रविवारी सायंकाळी शाखा भेटी देण्यासाठी ठाण्यात आले होते. यावेळी ते बोलत होते.

आदित्य ठाकरे म्हणाले, ठाण्यात येतो तेव्हा जुन्या आठवणी येतात. ठाणेकरांनी खूप प्रेम दिलंय, गद्दार गेले पण ठाणे शिवसेनेचे राहिले आहे. सध्या खोटे बोला पण रडून बोला अशी नवी फॅशन झाली. रडायचे आणि जे पाहिजे ते मिळवायचे असे अनेकवेळा मी पाहिले आहे. काल देखील ते रडले. तुम्ही शिवसैनिक म्हणून अपयशी ठरलात. पण माणूस म्हणून पण अपयशी ठरलात असा थेट आरोप त्यांनी एकनाथ शिंदे यांच्यावर केला. भाजप आत टाकेल म्हणून २० मे २०२२ ला तुम्ही रडले होते असेही ते म्हणाले. ज्या व्यक्तीने तुम्हाला सर्व दिले. त्या व्यक्तीचे वडिल, पक्ष चोरण्याचा प्रयत्न तुम्ही केला. तुमच्या डोक्यावरचा गद्दारीचा शिक्का पुसला जाणार नाही असेही आदित्य ठाकरे म्हणाले.

## माजी राज्यमंत्री रजनी सातव यांचे निधन

हिंगोली दि.१८ (प्रतिनिधी)- राज्याच्या माजी आरोग्य, समाजकल्याण राज्यमंत्री, राज्य महिला आयोगाच्या माजी अध्यक्षा ॲड. रजनी शंकरराव सातव (वय ७५) यांचे रविवारी सायंकाळी अल्पशा आजाराने नांदेड येथे उपचारादरम्यान निधन झाले. त्या काँग्रेसचे दिवंगत नेते ?ड. राजीव सातव यांच्या मातोश्री होत. त्यांच्या पार्थिवावर सोमवारी दुपारी कळमनुरी येथे अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत.

रजनी सातव यांच्या मागे स्नुषा आमदार डॉ. प्रज्ञा



सातव, दोन नातवंडे असा परिवार आहे. रजनी सातव या १९८० ते ९० कळमनुरीतून विधान सभेत तर १९९४ ते २००० या दरम्यान स्थानिक स्वराज्य संस्थेतून विधान परिषदेच्या आमदार होत्या. त्या मूळच्या पुण्याच्या होत्या.

## सुमित्रा पवार-सुप्रिया सुळे यांचा लोकसभा निवडणूकीत सामना रंगणार?

पुणे दि.१८ (प्रतिनिधी)- खासदार सुप्रिया सुळे आणि उपमुख्यमंत्री अजित पवार या राज्याच्या ताई आणि दादा यांच्या तू तू मै मै सुरुच असल्याचं मागील काही दिवसांपासून पाहायला मिळत आहे. पुणे दौऱ्यावर असताना त्यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यावर टीकेची झोड उठवली आहे. अजित पवार यांनी संसदेत भाषण देऊन उपयोग नाही. गावागावात फिरावं लागतं आणि त्यासोबतच सेल्फी काढत असल्याची टीका सुप्रिया सुळेंवर केली होती. त्या टीकेवर सुप्रिया सुळे यांनी प्रत्युत्तर दिलं आहे. लोकसभेत आम्हाला मुद्दे मांडण्यासाठी निवडून दिलं आहे. अनेक मोठ्या लोकांनी संसदेत भाषणं केली असल्याचं त्यांनी खड्या शब्दांत सांगितलं.

पुण्यात खासदार सुप्रिया सुळे यांनी विविध विषयांवर भाष्य केलं मात्र याचवेळी त्यांनी अजित पवारांना टोगा लगावण्याची एकही संधी सोडली नाही. अजित पवारांनी दोन दिवसांपूर्वी बारामतीच्या एका कार्यक्रमात पवार कुटुंबियांनी मला एकटं सोडलं तरी तुम्ही मला एकटं सोडू नका, अशी भावनिक साद घातली. त्यावर सुप्रिया सुळे यांनी सगळे लोक माझी फॅमिली आहे. शेजारी बसलेल्या लोकांकडे हात दाखवून हे देखील माझं कुटुंब असल्याचं त्या म्हणाल्या आणि फॅमिली दिल से बनती है म्हणत त्यांनी अजित पवारांना टोला लगावला.

देशाच्या संसदेत महाराष्ट्रातील अनेक मोठ्या नेत्यांनी भाषणं केली आहेत. त्याचे भाषणं ऐकून आम्ही संसदेत पाय ठेवतो. यशवंतराव चव्हाणांचे संसदेतील भाषण गाजले आहे. त्याकाळात काही प्रसारमाध्यामं सोडली तर एवढे प्रसारमाध्यमं नव्हती मात्र त्यांच्या भाषणं आजही अनेकांना आठवतात आणि त्यांच्या भाषणाची शैली आणि त्यावरुन घेण्यात आलेले निर्णय आजही आठवतात. संसदेतील भाषण आरोप, राजकीय प्रवेश करायला उपयोगी ठरतो, असंही त्यांनी स्पष्ट केलं आहे.

## काका आणि पुतण्याचे नाते कसे असायला पाहिजे, रितेश देशमुखांचा अजित पवारांना अप्रत्यक्ष टोला

लातूर दि.१८ (प्रतिनिधी)- लातूरमध्ये विलासराव सहकार कारखान्यात विलासराव देशमुख यांच्या पुतळ्याचं अनावरण पार पडलं, या कार्यक्रमात अभिनेता रितेश देशमुख उपस्थित होता. यावेळी रितेश देखमुखने वडिलांच्या आठवणींना उजाळा दिला. यासोबत रितेश देशमुखने राजकीय टोलेबाजीही केली आहे. काका आणि पुतण्याचं नातं कसं असायला पाहिजे, असं म्हणत रितेश देशमुखने अजित पवारांना अप्रत्यक्ष टोला मारला आहे.रितेश देशमुखमने म्हटलं की, आजकाल राजकारणामध्ये कुठल्या-कुठल्या पातळीला भाषण जातात हे पाहून दुःख होतं, जो महाराष्ट्र एकेकाळी दिग्गज नेते त्याच्या भाषणांना गाजवला, तो काळ आता दिसत नाही. भावा-भावांचं प्रेम विलासराव साहेब आणि दिलीपराव साहेबांनी शिकवलं. काका आणि पुतण्यामधील प्रेम कसं असावं याचं हे उत्तम उदाहरण आहे, असंही रितेशने म्हटलं आहे. आज साहेबांना जाऊन जवळपास १२ वर्ष झाली. थोडी फार उणीव नेहमीच भासते, पण ही उणीव आपल्याला कधी भासू नये म्हणून काका नेहमी मागे उभे राहिले. याच्यासाठी उभे राहिले की, आपल्या मुलाला गरज असली तरी मी आहे आणि नसली तरीही मी आहे.

# जैन मुनी आचार्य श्री विद्यासागर महाराज यांचे निर्वाण

किणी (छत्तीसगड) दि.१८ (वृत्तसंस्था)- दिगंबर जैन मुनी परंपरेचे आचार्य श्री विद्यासागर महाराज यांचे शनिवारी रात्री २ वाजून ३५ मिनिटांनी डोंगरगढ चंद्रगिरी (छत्तीसगड) येथे समाधीपूर्वक निर्वाण झाले.त्यांच्या समाधीमरणाने संपूर्ण जैन समाजासह त्यांचा भक्तगण शोकसागरात बुडाला आहे.

कर्नाटकमधील सदलगा (ता. चिकोडी, जि. बेळगाव) येथे १० ऑक्टोबर १९४६ ला शरद पौर्णिमेला जन्मलेल्या विद्यासागर यांनी ९ वी पर्यंत शिक्षण घेतल्यानंतर १९६६ ला आचार्य देशभूषण महाराज यांच्याकडून ब्रह्मचर्य व्रत स्वीकारले होते. ३० जून १९६८ रोजी कठोर तपश्चर्या पाहून त्यांना आचार्य ज्ञानसागर महाराज यांनी मुनींदिक्षा दिली. ते २४ वर्षाचे असताना त्यांच्या गुरूंनी त्यांच्याकडे आचार्यपद सोपवले. संपूर्ण जगातील जैन व जैनेत्तर धर्मातील करोडो लोकांचे आस्थास्थान असणाऱ्या आचार्य विद्यासागर यांनी संपूर्ण भारतभर भ्रमण करत सत्य अहिंसा आणि



शिक्षणाचा प्रसार केला. विविध ठिकाणी भव्य दिव्य जैन तीर्थक्षेत्र उभारण्याबरोबरच गोशाळा, शैक्षणिक संस्था उभ्या केल्या. 'मुकमाटी' या त्यांनी लिहिलेल्या महाकाव्यास अनेक राष्ट्रीय व जागतिक पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले. आयुष्यभर त्यांनी गोड पदार्थांचा त्याग केला होता. नोव्हेंबर महिन्यात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी त्यांचे डोंगरगढ येथे दर्शन घेऊन विविध विषयांवर मार्गदर्शन घेतले होते. गेले काही दिवस त्यांची प्रकृती अस्वस्थ होती. ६ फेब्रुवारी रोजी त्यांनी निर्यापकश्रमण योगसागर महाराज यांच्याशी चर्चा करून मुनिसंघ कार्यातून निवृत्ती घेत आचार्यपदाचा त्याग केला. गेली तीन दिवस अखंड मौन धारण करत त्यांनी आहार आणि संघाचा त्याग करत यम सल्लेखना धारण केली. शनिवारी रात्री २ वाजून ३८ मिनिटांनी त्यांना समाधीमरण प्राप्त झाले. रविवारी दुपारी डोंगरगढ येथे त्यांचा देह पंचत्वात विलीन होईल.

## मी इथे आहे तोपर्यंत तुम्हाला घाबरायची गरज नाही; अजित पवारांकडून मुस्लीम बांधवांना भावनिक साद

वाशी दि.१८ (प्रतिनिधी)- आम्ही अनेकांना कॅबिनेटमध्ये आणि पक्षात पदाधिकारी मुस्लिम अल्पसंख्याक बांधवना केलं आहे, आम्ही फक्त बोलत नाही करून दाखवतो, असे प्रतिपादन उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केले. मी शब्दाला पक्का आहे, खोटं बोलत नाही, तुम्ही घाबरू नका मी आहे असे सांगत मुस्लीम समुदायाला भावनिक साद घातली. वाशीमध्ये राज्यस्तरीय अल्पसंख्याक विश्वास मेळाव्यात अजित पवार यांनी मुस्लीम समाजाला विश्वास देण्याचा प्रयत्न केला. मी तुम्हाला सर्वांना अश्वस्त करतो आपल्या सुरक्षेची जबाबदारी आम्ही करू, मुस्लिम बंधू महाराजांसोबतही होते असेही त्यांनी सांगितले.

# युगप्रवर्तक राजा : छत्रपती शिवाजी महाराज

हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज म्हणजे प्रखर राष्ट्रभक्ती, समाजभक्ती व राष्ट्रीय एकात्मतेचे प्रतीक होते. सर्वधर्म समभाव म्हणून त्यांनी सर्व जाती, धर्म, पंथ व सांप्रदायाच्या लोकांना समानतेची वागणूक देवून संपूर्ण विश्वाला आदर्शाचे पाठ दिले. शिवाजी महाराजांची कर्तव्यनिष्ठा, राष्ट्रनिष्ठा, राष्ट्रभक्ती आजही हजारो-लाखो युवकांना प्रेरणादायी ठरत आहे.

छत्रपती शिवाजी महाराजांपूर्वी समाज पूर्णपणे विखुरलेला होता. अन्याय, अत्याचार वाढलेले होते. जुलमी राजवटीचे अत्याचार देशवासीयांना त्रासून सोडत होते. मराठी बाणा जणू नव्हताच. अशा परिस्थितीचा सखोल अभ्यास छत्रपती शिवाजी महाराजांनी केला. रयतेला सुखी करण्याचा, रयतेला स्वातंत्र्य मिळवून त्यांना त्यांचे हक्क मिळवून देण्याचा निर्णय शिवाजी महाराजांनी हाती घेतला. देशातील सर्व जातीधर्म, पंथ व सांप्रदायाच्या नागरिकांना एकत्र आणून त्यांच्यात मानवतेचे बीजारोपन करण्याचे काम छत्रपती शिवाजी महाराजांनी हाती घेतले आणि यासाठी त्यांचे प्रेरणास्त्रोत होते त्यांचे वडील शहाजीराजे आणि मातोश्री जिजाबाई. त्याकाळी धर्मांध सत्तेचे प्रस्थ होते. ही धर्मांध राजेशाही प्रजेच्या सुखाकडे लक्ष देणार नाही हे शिवाजी महाराजांनी जाणले आणि म्हणूनच स्वराज्य स्थापनेची प्रतिज्ञा रायरेश्वराच्या मंदिरात आपल्या सवंगड्यासोबत केली.

स्वराज्य व मानवांचे स्वाभिमानी हिंदवी स्वराज्य स्थापन करावयाचे असेल तर कुणाच्या अधिपत्याखाली ते स्थापन करता येणार नाही हे शिवाजी महाराजांनी जाणले आणि यास्तव त्यांनी कुणाचीही चाकरी स्विकारली नाही. शहाजीराजे अत्यंत स्वाभिमानी होते. त्यांनीही शिवबांना चाकरीपासून दूर ठेवले. जिजाबाईंनी राम लक्ष्मणच्या कृष्ण-अर्जुनाच्या गोष्टी सांगून शिवबांच्या मनाची निकोप, निरोगी, सक्षम, सुदृढ वाढ करायला सुरूवात केली. महाराणा प्रतापसिंहाचा स्वाभिमानही शिवबांना शिकविला. प्रखर राष्ट्र-निष्ठा, राष्ट्रप्रेम, जनप्रेम, भूमाताप्रेम हे राणा प्रतापसिंहांचे गुण शिवाजी महाराजांच्या रक्तात भिनवलं आणि छत्रपती शिवाजी महाराजांच्या मनामध्ये स्वराज्य प्रेम, स्वराज्य स्थापनेचे विचार साकारू लागले.

शिवाजी महाराजांची शासनप्रणाली, शिवाजी महाराजांची दूरदृष्टी, शिवाजी महाराजांचे अष्टप्रधान मंडळ, जिजामातेची छत्रछाया, शहाजी राजांचे पितृप्रेम या सर्व बाबींचा आजच्या शासनकर्त्यांनी आदर्श घ्यावा अशा या सर्व बाबी आहेत. शिवाजी महाराजांचे स्वराज्य उभारणीचे कार्य इतके महान व थोर आहे की, आज आपण एकसंघ भारत, राष्ट्रीय एकात्मता, राष्ट्रीय अखंडता, बंधूता, सर्वधर्म समभाव या बाबींविषयी जी चर्चा करतो ती छत्रपती शिवाजी महाराजांनी सतराव्या शतकातच पेरलेली आहे. स्वराज्याची स्थापना करून सर्वधर्म समभावाचे आदर्श बिजारोपन शिवाजी महाराजांनी संपूर्ण विश्वाला चारशे वर्षांपूर्वीच दर्शविलेले आहे. त्यांच्या आदर्श सुराज्याचा अभ्यास आजच्या शासनकर्त्यांनी करावा व शिवरायांची राजनिती, शिवरायांचा सर्वधर्म समभाव, प्रखर राष्ट्रनिष्ठ निष्ठा, राष्ट्रभक्ती व राष्ट्रीय एकात्मता अंमलात आणावी असे दर्शविते. शिवाजी महाराजांना स्वराज्याची गरज आपल्या लोकांना समजावून सागतांना खूप वेळ लागला. लोकांच्या संघटीत होण्यापासून ते स्वराज्याभिषेक सोहळ्यापर्यंत त्यांना अनेक समस्या, अडचणी आल्या. कुठे स्वकीय तर कुठे परकियांशी त्यांना दोन हात करावे लागले. मात्र त्यांनी ज्या सुराज्य स्वराज्याची स्वप्ने पाहिली होती ती मात्र पूर्णत्वास गेली आणि जसे स्वराज्य पाहिले तसे ते साकारण्यात शिवाजी महाराजांना यश मिळाले. जिवापाड शिवाजी महाराजांना जपणारे त्यांचे शिलेदार, सवंगडी व तत्कालीन समाजातील सर्व नागरिक यांच्यामुळे एक आदर्श राज्य उदयास आले म्हणून शिवाजी महाराजांना युगपुरूष असेही म्हणतात.

स्वराज्यनिर्मितीनंतर या स्वराज्यात प्रजेमध्ये शांतता नांदावी त्यांना आपले धार्मिक उत्सव मोकळ्या वातावरणात साजरे करता यावे. धार्मिक सलोखा समाजात नांदावा. तव्दतच स्वराज्यातील नागरिकांना आर्थिक सुबत्ता लाभावी ही दूरदृष्टी सुद्धा शिवाजी महाराजांनी ठेवूनच स्वराज्य निर्मिती केली. स्वराज्य स्थापनेचा मुख्य हेतू होता. प्रजाहित आणि तो स्वराज्यानंतर साध्य झाला. छत्रपती शिवाजी महाराजांनी आपल्या स्वराज्यातील प्रमुख पदावर नेमणूक करताना हिंदू मुसलमान असा भेदभाव केला नाही. गुणवत्ता व स्वराज्यनिष्ठा या कसोट्या त्यांनी नेमणूक करताना लावल्या होत्या. शिवाजी महाराज निष्ठावान हिंदू असले तरी स्वराज्यातील सर्वांना त्यांनी त्यांच्या धर्माप्रमाणे वागण्याची अनुमती दिलेली होती. शिवाजी महाराजांना प्रजाहित दक्ष राजा म्हणतात, कारण त्यांनी मुळात स्वराज्याची निर्मिती प्रजेच्या सुखासाठी, संपन्नतेसाठी केली होती. लोकांची गाऱ्हाणी ऐकून त्या दूर करणे यावर त्यांचा कटाक्ष होता. शिवाजी महाराजांनी नि:पक्षपातीपणाने न्याय दिलेला आहे. जे वास्तव व खरे आहे त्याची शहानिशा झाल्यावरच ते योग्य असेल तो न्याय त्यांनी दिला. शिवाजी महाराजांनी स्वराज्याची निर्मिती मुळात लोकशाहीच्या तत्वावर केली होती. लोकांनी, लोकांकरिता व लोकांकडून चालविलेले राज्य त्यांना अपेक्षित होते आणि त्याप्रमाणे त्यांनी शासन चालविले. दुसऱ्यांची मदत न घेता स्वबळावर शिवाजी महाराजांनी स्वराज्याची स्थापना केली याची नोंद संपूर्ण विश्वाने ठेवलेली आहे. शिवाजी महाराजांनी ज्या ध्येय व उद्दिष्टाने स्वराज्य निर्मिले ते त्यांनी साध्य केले.

प्रखर धैर्य, दूरदृष्टी, कुशलता, स्वराज्यनिष्ठा संघिकपणा, सहकारी निष्ठा या गुणांच्या आधारे छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्य निर्माण करून संपूर्ण विश्वाला आपण युगपुरूष, युगप्रवर्तक असल्याचे दाखवून दिले. आजच्या युवकांनी शिवरायांच्या चारित्र्यापासून, शिवरायांच्या प्रखर राष्ट्रनिष्ठा व राष्ट्रनिष्ठ भक्तीपासून प्रेरणा व प्रोत्साहन घेवून उद्याचा हिंदुस्थान सक्षम, सुदृढ, निकोप, निरोगी व लोकांचा व सर्वधर्म समभावाचा हिंदुस्थान घडवावयाचा आहे असा ठाम निश्चय करण्याची गरज आहे. शिवरायांचे आदर्श अंगी बनवून या समाजाला व देशाला सुयोग्य आकार देण्याची जबाबदारी आता युवकांची आहे.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंती निमित्त त्यांच्या पावन स्मृतीस विनम्र अभिवादन !

# शिवसमर्थ : महाराष्ट्राचा भाग्योदय




अखेर आदिलशहाने राजे शहाजीस अटक करुन शिवबास पत्र लिहिले. आपणास काय हवे? स्वराज्य की सौभाग्य? पत्र वाचून राजे अस्वस्थ झाले. स्वराज्याच्या बाजूने कौल द्यावा तर मर्द मराठ्यांच्या भावनाशी खेळल्यासारखं होईल. मृत्यूशी झुंज देऊन शत्रूला टाचेखाली रगडून एक गड स्वराज्यात खेचून आणलेला होता. आईच्या सौभाग्यासाठी किल्ले परत करणं म्हणजे मर्द मराठ्यांशी गद्दारी केल्यासारखं होतं, काय करावं? काय निर्णय घ्यावा ! महाराज कमालीचे अस्वस्थ होते बेचैन होते.

सद्गुरुच्या आशीर्वादाशिवाय आणि भगवंताच्या अधिष्ठानाशिवाय नुसत्या प्रयत्नाला काही अर्थ नाही. हे महाराजांनी ओळखले. अन् ते लगेच देहूला संतश्रेष्ठ तुकाराम महाराजांच्या दर्शनासाठी आले. महाराजांच्या पायावर मस्तक ठेवून अनुग्रह द्यावा, अशी विनंती केली तेव्हा संत तुकाराम म्हणाले -

***राया छत्रपती । ऐकावे वचन रामदासी मन । लावी वेगी रामदास स्वामी । सोयरा सज्जन त्यासी तनमन । अर्प्पी बापा ॥***

म्हणजे तुकोबा रायांनी राजे शिवबाला समर्थांचा अनुग्रह घ्यावा असे सुचविले. यावरुन एक गोष्ट लक्षात येते, समर्थांचं कार्य तुकारामांना माहीत होतं, शिवबाच्या कानावरही समर्थांचा लौकिक आलेला होता. मनामनात राष्ट्रभक्तीची ज्योत प्रज्वलीत करणाऱ्या राष्ट्रगुरु समर्थांचं दर्शन घ्यावं, अशी शिवबाचीही फार दिवसांची इच्छा होती, पण योग येत नव्हता आता तर संतश्रेष्ठ तुकोबारायांनी आज्ञाच केली होती.

तिकडे समर्थांनाही शिवरायाच्या भेटीची ओढ लागली होती. राजे शिवबा म्हणजे महाराष्ट्र भूमीच, मराठी माणसाचं वैभव होतं. हिंदवी स्वराज्याचं हिरवं स्वप्न होतं. समर्थांनी राजे शिवबास पत्र लिहून ते दिवाकर गोसावी आणि उद्धव गोसावी यांच्याजवळ देऊन ते शिवबास नेऊन द्यावे, अशी आज्ञा केली. यावेळी महाराजांचा मुक्काम वाईस होता. चाफळ वाई अंतर तसं फारसं नव्हतं. दिवाकर गोसावी यांनी समर्थांचं पत्र राजे शिवबाच्या हाती देताच त्यांचं मन भरुन आलं, मस्तकी लखोटा लावून उघडला.

***निश्चयाचा महामेरु । बहुत जनांसी आधारु । अखंड स्थितीचा निर्धारु । श्रीमंत योगी नरपती हयपती गजपती । गडपती भूपति जळपति पुरंदर आणि आदीशक्ती । पृष्टी भागी यशवंत किर्तीवंत सामर्थ्यवंत वरदवंत । पुण्यवंत नितीवंत । जाणता राजा ॥***

पंधरा श्लोकांचं अत्यंत सुंदर, आशयगर्भ पत्र वाचून राजे शिवबानी ते पुन्हा एकदा मस्तकी लावून वाफळ क्षेत्री जाण्याचा निर्णय घेतला. पत्रातील भाषेवरुन समर्थांचं सामर्थ्य जाणवलं, दिवाकर स्वामीबरोबरच महाराज समर्थांच्या दर्शनासाठी निघाले. सोबत सातशे मर्द मावळे होते.

राजे चाफळला आले तेव्हा श्रीमंत वेणा..... त्यांचं स्वागत केलं अन् समर्थ शिंगणवाडीस असल्याचे सांगितले. रामरायाचं दर्शन व प्रसाद घेऊन राजे शिंगरवाडीस आले. तेव्हा एका झाडाखाली समर्थ बसलेले होते. ते काहीतरी बोलत होते आणि कल्याणस्वामी सुंदर अक्षरात लिहीत होते. समर्थांची भव्य बलदंड अन् तेजस्वी मूर्ती पाहताच राजे शिवबा खाली वाकले तोच समर्थांनी त्यांना कडकडून मिठी मारली. दोन महापुरुषांचं मिलन म्हणजे जणू आत्मा आणि परमात्म्याचं मिलन ! विक्रम अन वैराग्याचं मिलन ! शिवसमर्थ भेट म्हणजे महाराष्ट्र-ाच्या पावन भूमीतला महान्मंगल क्षण ! जणू स्वराज्याचा सूर्यादय ! हा आनंद सोहळा डोळे भरुन सातशे मावळे पाहत होते. सर्वांनी समर्थांना विनम्रपणे अभिवादन केलं, उसळता पुरुषार्थ अन् उत्कट देशभक्ती पाहून समर्थांचं मन भरुन आलं, आज स्वराज्याचं साधन समर्थांच्या हाती आलं होतं, तर स्वराज्य लढ्याला, हिंदवी स्वराज्याला समर्थाचं अधिष्ठान लाभलं होतं, राजे शिवबा अन् मावळे समोर शांतपणे बसले होते. समर्थ बोलू लागले. जयास वाटे जीवाचे भय। तेणे क्षात्र धर्म करु नये। काही तरी करुनी उपाये। पोट भरावे।

**मारिता मारिता मरावे ।**
**तेणे गतीस पावावे**
**फिरोन येता भोगावे ।**
**महदभाग्य धर्माकरिता**
**मरावे । मरोनि अवघ्यास**
**मारावे**
**मारिता मारिता घ्यावे ।**
**राज्य आपुले**
**देवमात्र उच्छादिला ।**
**आपला स्वधर्म बुडाला**
**जित्या परीस मृत्यू मला ।**
**ऐरे समजावे**
**देवद्रोही तितुके कुत्रे ।**
**मारोनी घालावे परते**
**देवदास पावती फते ।**
**यदर्शी संशयो नाही ॥**

समर्थांच्या वाणीतून तेजस्वी शब्दांचा, अमृताचा वर्षाव होत होता. वातावरण पार बदलून गेलं, स्वराज्यासाठी अन् स्वधर्मासाठी झुंज देण्यातच खरा पुरुषार्थ आहे. मृत्युशी झुंज देऊन मोगलांची सत्ता उलटून टाका. गुलामगिरीत जगण्यापेक्षा मृत्यू बरा. देवद्रोही कुत्रे मारुन टाका' समर्थांच्या शब्दात जणू अंगार फुलत होता. साऱ्यांची मने देशभक्तीने पेटून उठली. हर ऽ हर ऽ महादेव गर्जना आकाशाला भिडली. समर्थांनी मर्द मराठ्यांच्या पुरुषार्थालाच आव्हान केलं होतं, समर्थाच्या मुखातून भगवद्गीता, कर्मयोग स्त्रवत होता. स्वराज्याचं सुंदर स्वप्न उराशी कवटाळून मृत्यू जयाची फौज निघाली. राजे शिवबानी पुन्हा एकदा वाकून समर्थांना अभिवादन केले. आता स्वराज्याच्या मोहिमेला समर्थांचा, सद्गुरुचा आशीर्वाद लाभला होता. भगवंताचे अधिष्ठान लाभले होते. आता या स्वराज्याच्या अरबाला रोखण्याची ताकद कुणातच नव्हती. समर्थाच्या आशीर्वादाची कवच कुंडले घेऊन राजे शिवबांनी निरोप घेतला. धर्म आणि स्वराज्य हे दोन शब्द डोळ्यासमोर तरळत होते. शिवशाहीला समर्थाचं अधिष्ठान लाभलं. समर्थासारख्या समर्थ सद्गुरु आणि शिवबासारखा निष्ठावंत पराक्रमी शिष्य एकत्र आले म्हणून या आनंदवन भुवनात महाराष्ट्रात स्वराज्य साकार होऊ शकलं, रामराज्य अवतरलं, पण आज याच आनंदवनात महाराष्ट्र भूमीत आचार्य आणि शिष्य यांच्यात प्रचंड दरी निर्माण झाल्यामुळे सारा समाज तत्त्वापासून, मूल्यापासून ढळला आहे. सारी शासन व्यवस्था भ्रष्टाचारांनी किडली असून सर्वसामान्य माणसांचं अस्तित्व धोक्यात आलं आहे. आचार्य संस्था खिळखिळी झाल्यामुळे कणा मोडलेला माणूस इथे वाढतो आहे. राष्ट्र अन् राष्ट्रधर्म हे शब्द मोडीत गेले असून कुटुंब संस्थाही उद्‌ध्वस्त झाली आहे. 'स्वार्थ' हा या युगाचा परवलीचा शब्द बनला असून माणूस माणसापासून दूर गेला आहे. ज्या देशात गुरुत्व कलंकित होतं, मूल्यापासून ढळलेलं असतं, त्या देशाला भवितव्य नसतं, माझा विद्यार्थी हा कातडी सांभाळणारा नसून तो मूल्यासाठी संघर्ष करणारा असेल. झुंज देणारा असेल, या निष्ठेतून आचार्य संस्था जेव्हा कार्यरत असते. तेव्हाच राष्ट्र हे समर्थपणे उभे राहते. स्वाभिमानी पुरुषार्थ अन् विवेकी माणूस म्हणजे राष्ट-ाचं खरं सामर्थ्य ! म्हणून समर्थ राष्ट-ाच्या उभारणीसाठी समर्थांचा विचार मनामनात रुजणे ही काळाची गरज आहे. इथे आपण चुकलोत तर काळ आपल्याला क्षमा करणार नाही. आपल्या विनाशाला आपणच जबाबदार ठरुत. म्हणून शिवसमर्थांचा विचार डोळ्यासमोर ठेवून पावलं उचलली तरच स्वराज्याचं सुराज्य होईल. शिवसमर्थ म्हणजे महाराष्ट्राचा भाग्योदय!

# युगपुरुष छत्रपती शिवाजी

युगपुरुष छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती तारखेनुसार १९ फेब्रुवारी सोमवारी साजरी होत आहे. छत्रपती शिवाजी महाराज हे असे महापुरुष होऊन गेले की, त्यांचे कार्य, पराक्रम आणि विचार यांची प्रेरणा अजूनही ताजी आहे. आजही आपण त्यांच्या काळासंदर्भात त्यांच्या स्वराज्य निर्मितीचा विचार करायला लागतो तेव्हा त्यांनी किती प्रतिकूल स्थितीत हे सतीचे वाण आपल्या हाती घेतले होते याचा अचंबा वाटतो. शिवाजी महाराज त्या प्रदेशात रहात होते तो प्रदेश आदिलशहाच्या अधिपत्याखाली होता आणि त्या मध्ययुगीन राजवटींमध्ये सुलतानांच्या विरोधात बंडावा करणे म्हणजे प्राणाशी गाठच असायची. डोळे फोडणे, मालमत्तेची राखरांगोळी करून जबर दंड बसवणे, कुटुंबांसह जाळून हत्या करणे, तोफोच्या तोंडी देणे, कडेलोट करणे, हत्तीच्या पायाखाली चिरडून मारणे किंवा घोड्यांच्या पायांना बांधून फरपटत नेणे अशा अमानुष शिक्षा दिल्या जात असत. अशा शिक्षा भोगण्यापेक्षा त्या सुलतानांच्या पायाशी शरण जाणे परवडेल अशी मानसिकता समाजता होती, पण शिवाजी महाराजांनी अशाही स्थितीत परकियांची राजवट उलथून टाकून स्वत:चे राज्य निर्माण करण्याचा पण केला. हे त्यांचे महान कार्य



आजही आपल्याला प्रेरणा देत असते.

एकदा असे साहस करण्याचा निर्धार केल्यावर कितीही संकटे आली तरीही आपल्या ध्येयापासून विचलित न होण्याचा त्यांचा गुणही असामान्यच होता. राजेच निश्चयापासून ढळले असते तर सारे सहकारीही बिथरले असते. म्हणून खंबीरपणे उभे राहून महाराजांनी केवळ अडचणींना तोंडच दिले असे नाही तर त्या अडचणींतून मोठ्या कुशलतेने मार्गही काढला. महाराजांनी आपल्या सवंगड्यात स्वराज्य स्थापनेचा ध्येयवाद इतका पक्का रुजवला होता की, त्या ध्येयवादाच्या मार्गातून त्यांचे सहकारी कधीही ढळले नाहीत. शिवाजी महाराजांचे काही आप्तच त्यांचा विरोधात होते. अशावेळी त्यांना निष्ठा वाहिलेल्या कोणीही, महाराजांचे आप्तच स्वराज्याच्या विरोधात आहेत मग आपणाच स्वराज्यापायी आपल्या संसाराची वाताहत कशाला करून घ्यायची असा विपरीत विचार केला नाही. त्यंनी आपली निष्ठा महाराजांना वाहिली.

शिवाजी महाराजांनी स्वराज्य स्थापन केले हाच केवळ त्यांचा मोठेपणा आहे असे नाही, तर त्यांनी शून्यातून स्वराज्य निर्माण केले आणि अक्षरश: मूठभर सहकाऱ्यांच्या मदतीने ते इतिहासदत्त कार्य केले. असे करण्यासाठी लागणारी धीरोदात्त वृत्ती, संकटाशी मुकाबला करण्यासाठी करावे लागणारे बिनचूक नियोजन आणि त्या नियोजनप्रमाणे काम पार पाडण्यासाठी आवश्यक असलेले व्यवस्थापन हे गुण त्यांच्या ठायी होते म्हणूनच हे शक्य झाले. त्यांच्या अंगी असलेल्या या गुणांचा अभ्यास, विश्लेषण आणि अनुकरण करणे आजही आवश्यक आहे.

मध्ययुगामध्ये अनेक राजे, महाराजे आणि सुलतान होऊन गेले. त्या प्रत्येकाशी तुलना केली तर शिवाजी महाराजांचे स्वराज्य विस्ताराने फारसे मोठे नव्हते. परंतु त्यांच्या समकालीन असलेल्या कोणत्याही सुलतानापेक्षा किंवा शहापेक्षा शिवाजी महाराजांचे पोवाडे जास्त गायिले जातात. त्याचे सर्वात मोठे कारण होते शिवाजी महाराजांची प्रजाहितदक्षता. आपल्या राज्यामध्ये प्रजेला कसलाही त्रास होता कामा नये याबाबत महाराज कमालीचे दक्ष होते. त्यामुळे त्यावेळच्या प्रजेला स्वराज्य आपले आहे असे वाटत असे. अन्य राजवटीच्या बाबतीत असे घडलेले नव्हते, हे महाराजांचे वैशिष्ट होते. त्याकाळेचे जाहगीदार, वतनदार प्रजेला पिळून स्वत: ऐटित राहत असत आणि सामान्य माणांसावर अनेक प्रकारचे अत्याचार करत असत. परंतु प्रजेवर पुत्रवत प्रेम करणारे शिवाजी महाराज हे त्या काळात एक आगळेवेगळे राजे म्हणून जाणले जात. प्रजेला सवलती देणारा राजा ही संकल्पनाच त्या मध्ययुगामध्ये क्रांतीकारक ठरलेली होती. म्हणूनच शिवाजी महाराजांविषयी असे म्हटले जाते की, राजे तर अनेक होऊन गेले, पण त्यातल्या कोणत्याही राजाला प्रजेने देवाचा अवतार मानलेले नव्हते. शिवाजी महाराजांना मात्र जनतेने देवाचा अवतार मानलेले होते. शिवाजी महाराजांचे हे वैशिष्ट्य आजच्या राज्यकर्त्यांनी अवश्य विचारात घेतले पाहिजे. कारण आपले आजचे राज्यकर्ते प्रजाहितदक्षतेचे कर्तव्य सोडून बाकी सगळ्या वाईट गोष्टी करायला लागले आहेत आणि त्यामुळे राजे आरामात जगत आहेत आणि प्रजा मात्र अनेक संकटांशी मुकाबला करत भरडली जात आहे. शिवाजी महाराजांच्या जयंतीच्या निमित्ताने आमच्या राज्यकर्त्यांनी एवढे चिंतन केले तरी प्रजा त्यांना दुवा देईल.

# छत्रपती शिवाजी महाराजांची कृषी नीती

**जगाच्या** इतिहासात अनेक राजे होऊन गेलीत. परंतु त्यातील अशी काही राजे होऊन गेलेली आहेत. की, त्यानी आपल्या स्वकर्तृत्वाची छाप जनतेच्या मनावर आजही कायम ठेवलेली आहे. त्यामुळे अनेक शतके होऊन गेली असली तरीही त्या राजांची आठवण,त्यांचे कार्य आजही सर्वसामान्य जनता विसरलेली नाही. त्यातील जनतेच्या आठवणीतील एक आदर्श राजा म्हणजे छत्रपती शिवाजी महाराज होत. छत्रपती शिवाजी महाराजांनी आपल्या स्वराज्यात राबविलेल्या धोरणांचा व त्यांच्या आदर्श प्रशासन व्यवस्थेचा आजही शेकडो वर्षे उलटून गेली असली तरीही समाज मोठ्या प्रमाणात आदर्श घेतो. एवढेच नाही तर छत्रपती शिवरायांनी आपल्या स्वराज्यात राबविलेली विविध धोरणे आजही समाजात तंतोतंत लागू पडतात. त्यामुळेच त्यांची जयंती देशभर मोठ्या उत्साहाने व आनंदाने साजरी केली जाते. तसे इतर कोणत्याही राज्याच्या बाबतीत घडत नाही. असे का व्हावे.? इतर राज्यापेक्षा शिवाजी महाराजांत काय वेगळेपण होते.? की, ज्यामुळे असे घडत आहे हे समजून घेतले तर छत्रपती शिवाजी महाराजांनी स्थापन केलेले स्वराज्य हे खऱ्या अर्थाने इथल्या रयतेचे, शेतकऱ्यांचे श्रमिकांचे राज्य होते. कारण शिवरायांनी आपल्या स्वराज्यात घालून दिलेली तत्त्वे, नियम व सवयी त्यांनी रयतेची घेतलेली काळजी, यामुळे स्वराज्यातील प्रत्येकाला शिवरायांचे राज्य हे आपले राज्य आहे. शिवाजी हा आपला राजा आहे. त्यांनी सुरु केलेले कार्य हे आपले कार्य आहे. असे त्या काळातील रयतेला वाटत असे. त्यामुळे शिवरायांच्या सर्व कार्यात सर्वसामान्य रयत सुद्धा आपआपल्या परीने सहभागी होत होती. शिवरायांच्या सैन्यात लढवय्ये सैनिक होते. परंतु सर्वसामान्य रयत सुद्धा आपआपल्या परीने लढ्यात सहभागी होत होती. रयत परकीय शत्रूपासून स्वराज्याचे रक्षण करीत होती. एखाद्या राज्यात जेव्हा रयत मनापासून सहभागी होत असते. तेव्हा त्या राज्याचे कार्य हे केवळ राज्याचे नसते तर ते सर्व रयतेचे असते. आणि म्हणूनच ते कार्य आदर्श ठरते. असाच पाठिंबा सर्वसामान्य शेतकरी रयतेचा छत्रपती शिवाजी महाराजांना मिळाला होता. त्यामुळे त्यांची प्रतिमा ही कुळवाडी भूषण, बहुजन प्रतिपालक, स्त्री उद्धारक, जाणता राजा म्हणून निर्माण झाली आहे.

स्वराज्यातील शेतकरी सुखी तर राजा सुखी हे शिवरायांच्या राज्यकारभाराचे धोरण होते. कारण शिवकाळात प्रत्यक्ष शेतात राबणारा शेतकरी हाच शिवकालीन शेतीचा मुख्य आधार होता. त्यांचा व्यवसाय हा समाजातील महत्त्वाचा मानला जात होता. कारण शेतकऱ्यांचे उत्पन्न हेच राज्याचे उत्पन्न होते. तसेच शेतकऱ्यांच्या युवा पिढीतून सैन्य मिळत असे. म्हणून शिवरायांनी शेतकऱ्यांसाठी अनेक योजना आपल्या स्वराज्यात राबविल्या होत्या. त्यासाठी जमिनीची योग्य प्रकारे मोजमाप करून, जमिनीची वर्गवारी ठरून त्यावर पीक पाहणी करण्याची व्यवस्था केली जात असे. आणि त्या जमिनीवर शेतसारा आकारला जात असे. शिवरायांनी शेतकऱ्यांसंदर्भात अनेक प्रकारच्या योजना आणि सवलती स्वराज्यात राबविल्या होत्या. त्या त्यांच्या काही पत्रांमधून आपल्याला समजतात. त्यात गावचा गाव फिरून तेथील शेतकरी जेवढे आहेत. ते गोळा करावे, कुणाकडे मनुष्यबळ आहे, बैल आहेत, कुणाकडे कशी व्यवस्था आहे. याची विचारपूस करणे. ज्यांच्याकडे शेती करण्याची कुवत आहे, मनुष्य बळ आहे. पण मशागतीत बैलजोडी नाही, बी-बियाने नाहीत. त्याला बैल घेण्यास रोख रक्कम देणे, किंवा सरकारकडून बैल, बी-बियाणे देणे. शेतकऱ्यास सरकारकडून दिलेले कर्ज वाढीव पद्धतीने वसूल न करता त्याच्या शेतीचे उत्पन्न तयार झाल्यावर त्यांच्या कुवतीनुसार हप्त्याने वसुल करावे. नवीन शेतकऱ्यास सोयी सवलती देऊन पडीक जमीन लागवडीखाली आणावी. यासाठी सरकारने रक्कम मंजूर करावी. ज्या शेतकऱ्यांवर सरकारची मागील बाकी येणे आहे पण ज्यांच्या जवळ काहीच नाही. अशा शेतकऱ्याची शेती करण्याची अजूनही उमेद असेल तर त्यास सर्व प्रकारची मदत करावी. त्यांच्यावरील कर्ज माफ करण्यासारखे असेल तर तसे कळवावे. असे कल्याणकारी धोरण छत्रपती शिवाजी महाराजांनी आपल्या स्वराज्यात शेतकऱ्यांच्या बाबतीत राबविले होते.

शिवरायांनी आपल्या स्वराज्यात शेतीला उत्तेजन देऊन महसूल वसुली पद्धतीतील दोष काढून मन मानेल तसा वसूल करण्याचा शिरस्ता मोडून काढला. त्यासाठी जमिनीची मोजणी केली. मोजलेल्या जमिनीचा महसूल निश्चित केला. ठरलेल्या महसूल वसूल करण्याचा दंडक घालून दिला व तो अंमलात आणला. दुष्काळात शेतकऱ्यांचा महसूल माफ केला. 'पिकलेच नाही तर शेतकरी देणार कोठून' हे समजून शिवराय वागले व दुष्काळात शेतकऱ्यांना मदत केली. एवढेच नाही तर वर्षानुवर्षे चालत आलेली वतनदारी व जमीनदारी पद्धत शिवरायांनी मोडून काढ़ली. रयतेकडून शेतसारा वसुलीची कामगिरी करण्यासाठी अधिकारी नेमले. त्यामुळे वतनदार व जमीनदारांच्या कचाट्यातून रयतेची सुटका झाली. त्यामुळे स्वराज्यातील जनता सुखी व स्वतंत्र झाली. एवढेच नाही तर रयतेस गुलाम करणाऱ्या देशमुख देशपांडे वगैरे ग्राम अधिकाऱ्यांचे वाडे, कोट पाडून जमीन दोस्त केले. त्याचप्रमाणे त्यांनी इतर रयतेसारखी घरे बांधून राहावे. असा हुकूम स्वराज्यात काढण्यात आला होता. शिवरायांच्या काळात मुघल, आदिलशाही, निजामशाही कुतुबशाही या सत्तेचे सैन्य गावागावातून जाऊ लागले किंवा मुक्कामास राहिले तर शेतकऱ्यांच्या संपत्तीचे पिकाचे नुकसान मोठया प्रमाणात होत असे.

उभ्या पिकातून त्यांचे घोडदळ सुसाट वेगाने जात असे. पिकांची मोठया प्रमाणात नासाडी करीत असे. त्यामुळे वर्षभर राबराब राबून घामाने पोसलेले अन् हाता तोंडाला आलेले तयार पीक बघता बघता भुई सपाट होत असे. याबाबतीत इतर सत्ताधीशांकडून त्यांच्या सैन्याला तशी मुभा दिलेली असे. परंतु याकाळात छत्रपती शिवाजी महाराजांनी आपल्या स्वराज्यातील सैन्यांना आदेश दिला होता. की, कोणत्याही मोहिमेवर जाताना सैन्याच्या कोणत्याही तुकडीने शेतकर्यांच्या उभ्या पिकातून जाता कामा नये, पिकाची नासाडी होता कामा नये, रयतेच्या भाजीच्या देठालाही हात लावता कामा नये, शेतकऱ्यांकडून कोणतीही वस्तू घेत असताना त्याचा योग्य तो मोबदला त्यांना द्यावा. अशी शेतकऱ्यांविषयी कणव त्याकाळी इतर कोणत्याही राज्याने दाखविली नाही ती छत्रपती शिवाजी महाराजांनी आपल्या स्वराज्यात राबविली म्हणून शेतकऱ्यांची शिवरायांबद्दल आगळी वेगळी निष्ठा होती. त्यामुळे शेतकऱ्यांची आणि शेतीची कशी काळजी घेणाऱ्या शिवरायांविषयी जनतेला प्रेम का नाही वाटणार! शिवरायांचे कार्य टिकले पाहिजे वाढले पाहिजे. असे का नाही वाटणार! रयत राज्याची कशी वागते, हे राजा रयतेशी कसा वागतो. यावरून ठरते राजा रयतेची एकपट काळजी करू लागला. तर रयत राज्याची दहा पट काळजी करते. त्यामुळे आजच्या काळात राज्य ही आपली खासगी मिळकत नसून ती जनतेची अनामत आहे. असे राज्यकर्ते वागू लागले. तर जनतेला हे राज्य आपले आहे. असे वाटेल आणि त्याच्या उलट जनता वगैरे काहीच नाही राज्य हे आमच्या बापजाद्यांनी मिळवलेली खाजगी दौलत आहे. अशा भावनेने राज्यकर्ते वागू लागले तर जनता अशा राज्यकर्त्यांना उलटून टाकते. हा जगाचा इतिहास आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना सोयी सवलती देणे, कर्जमाफी देणे ही सेवा आहे पण शेतकरी कर्जाबाजारी होऊच नाही अशी व्यवस्था निर्माण करणे. हे परिवर्तन आहे. त्यामुळे शिवाजी महाराजानी कृषी क्षेत्रात जे परिवर्तन घडविले. ते परिवर्तन आज घडविण्यासाठी शिवरायांच्या शेतीविषयक धोरणाचा अभ्यास करणे गरजेचे आहे.

**- प्रा.ताडेराव डी.बी.**
कला आणि वाणिज्य महाविद्यालय, फोंडाघाट ता. कणकवली जि. सिंधुदुर्ग

# छत्रपती शिवाजी महाराजांची युगधुरंधर पत्रे

**छत्रपती शिवाजी महाराजांची १९ फेब्रुवारी रोजी जयंती आहे. त्यानिमित्ताने महाराजांच्या एका वेगळ्या पैलूवर प्रकाश टाकण्याचा हा एक प्रयत्न...**



रयतेचा राजा म्हणून गौरविलेले, मराठी साम्राज्याचे संस्थापक, कुशल प्रशासक, लष्करी डावपेचांमध्ये पारंगत, वाढते मुघल साम्राज्य यशस्वीपणे रोखणारे असे छत्रपती शिवाजी महाराज यांचा जन्म ज्युलियन दिनदर्शिकेनुसार १९ फेब्रुवारी १६३० रोजी, हिंदू दिनदर्शिकेनुसार फालगुन कृष्ण तृतीयेला पुणे जिल्ह्यातील जुन्नर जवळील शिवनेरी गडावर झाला.

शिवाजी महाराजांच्या अंगी जन्मतःच नेतृत्व क्षमता होती. आई जिजाऊची शिकवण त्यांनी कायम अंगीकारली. वयाच्या अवघ्या पंधराव्या वर्षी त्यांनी काही विश्वासू मावळे यांना जमवून 'स्वराज्य' स्थापन करण्याची शपथ घेतली. शिवाजी महाराजांनी१६४५ पर्यंत आदिलशाहच्या पुणे प्रदेशाच्या आजूबाजूच्या चाकण, कोंढाणा, तोरणा, सिंहगड, पुरंदर या किल्याचा ताबा घेतला होता. शिवाजी महाराजांकडून मुघल साम्राज्याला धोका आहे, याची जाणीव आदिलशाहला झाली. पुढे गनिमी कावा वापरून महाराजांनी अनेक लढाया जिंकल्या.

मराठा साम्राज्य उभारल्यानंतर , ६ जून १६७४ रोजी महाराजांचा रायगडावर राज्याभिषेक झाला. त्यांनी अल्पावधीतच एक कुशल राज्यकर्ता म्हणून ख्याती मिळविली. त्यांची प्रशासकीय धोरणे अतिशय उपयुक्त आणि मानवी होती.त्यांनी सतत प्रजेच्या हिताचा विचार केला, त्यानुसार विविध आदेश दिले, विविध पत्रे दिली,या पत्रांमधून त्यांनी लोकहितवादी असे अनेक संदेश दिले. शिवाजी महाराजांनी आपल्या ३५ वर्षांच्या कालखंडात हजारो पत्रे लिहिली असावीत. पण काल प्रवाहात जेमतेम २०० पत्रे उपलब्ध आहेत. त्यापैकी अस्सल पत्रे १७७ असावीत. ज्या पत्रांवर छत्रपतींचे शिक्कामोर्तब म्हणजे मथळ्यावर ' प्रतिपतचंद्र' ही राजमुद्रा व शेवटी ' मर्यादेयं विराजते' ही मर्यादा मुद्रा असेल ती पत्रे अस्सल होत. १७७ पैकी १३२हुन अधिक पत्रे वतनबाब यासंबंधीची आहेत. राजकारणी पत्रे २१ आहेत तर सामाजिक व्यवस्थेविषयी १५ पेक्षा अधिक पत्रे आहेत. इतिहास काळातील पत्रलेखन म्हणजे प्रत्यक्ष लेखन लेखनिक करीत असे. त्यानुसार महाराज पत्राचा मसुदा तोंडी सांगत. त्यानंतर लेखनिकाने लिहिलेल्या पत्रात दुरुस्ती करून मोर्तब करीत . पत्र म्हणजे एका व्यक्तीने दुसऱ्या व्यक्तीला उद्देशुन लिहिलेला मजकूर होय. पण मराठीत पत्र ही संज्ञा वर्तमानपत्र या अर्थानेही वापरतात. पत्र म्हणजे नवी माहिती, नव्या ज्ञानाचे साधन असते.म्हणून व्यक्तीप्रमाणे सार्वजनिक जीवनातही पत्राचे स्थान महत्त्वाचे आहे. त्यामुळे सामाजिक अभिसरण शक्य होते. सामाजिक घडामोडींची नोंद होते.म्हणूनच शिवाजी महाराजांची पत्रे अनन्य साधारण ठरतात. महाराजांच्या पत्रात अर्थपूर्ण शब्द योजना दिसते. या शब्दांना तत्कालीन जीवनाचा संदर्भ असल्याने अशा शब्दांचा वापर वैशिष्ट्यपूर्ण वाटतो.काही पत्रात फारशी भाषेचा प्रभाव दिसतो तर काही पत्रात देशी शब्दांचा वापर दिसतो. उदा. - ' अवलाद अफलाद' ऐवजी 'लेकराचे लेकरी ' किंवा 'आणा शपथ' ऐवजी 'बोल भाक', 'कौल बोलू' या सारखे शब्द आहेत. एकंदरीतच , स्वराज्य काळात 'स्वाभिमान जागृती' ही मुख्य प्रेरणा होती, ती भाषिक व्यवहारातही दिसून येते. महाराजांच्या पत्रांमधून त्यांच्या व्यक्तीमत्वाचे अनेक पैलू दिसून येतात. त्यांचा रयतेविषयीचा जिव्हाळा, शिस्तप्रियता, प्रशासनातला करडा अंमल, प्रसंगी अधिकाऱ्यांची केलेली कान उघडणी, पराक्रमी वतनदार यांच्याविषयी वाटणारा आत्मभाव अशा विविध भावभावना, विचार दिसतात. समक्ष सूचना करावीं, मार्गदर्शन करावे, अशी त्यांची धाटणी वाटते. थोर पुरुषांनी प्रसंगोपात काढलेले उद्‌गार, व्यक्त केलेले विचार, स्फूर्तीप्रद संदेश यांना सुभाषिताचे सरूप प्राप्त होते. महाराजांच्या पत्रात अशी अनेक वाक्ये दिसतात. उदा.- 'एक भाजीच्या देठास तेही मन न दाखविणे 'गृहकलक बरा नव्हे', 'कथलियात फाईदा नाही', 'यात्रेमध्ये कोण्ही उपद्रव सहसा देऊ नये', ' महाराष्ट्र धर्म रक्षावा हा संकल्प' इत्यादी. महाराज मजुरास रास मजुरी मिळण्याबाबत दक्ष असत. रसद पोचविण्याच्या बाबतीत मधल्यामध्ये गफलत करणाऱ्याना त्यांनी खडसावले आहे.आपल्या सैनिकांनी कसे वर्तन करावे,याबाबत त्यांच्या स्पष्ट आज्ञा आहेत. शत्रू आपल्यापेक्षा भारी असेल तर ' गनिम दुरून नजरेस पडताच त्याचे धावणीची वाट चूकोन पलोन जाणे' अशी सूचना त्यांनी केली आहे. यावरून महाराजांचा गनिमी कावा दिसतो. महाराजांच्या पत्रांमधून समाजहित दक्ष, न्यायी, शिस्तप्रिय, कुशल प्रशासक इत्यादी गुणांनी युक्त अशा आदर्श राजाचे चित्र उभे राहते. त्यांच्या पत्रांचा अभ्यास केल्यास शब्द, वाक्य, सुभाषिते, वाक्प्रोयोग, शैलीदार निवेदन, सामाजिक जीवनाचा अनूबन्ध दिसून येतो. महाराजांनी कर्तृत्व गाजवून स्वराज्य स्थापन केले. स्वराज्य, स्वधर्म संगोपन या बरोबरच स्वभाषवृद्धीही त्यांच्याहातून झाली.त्यांच्या कर्तव्य क्षेत्राचा परीघ जेव्हढा मोठा झाला, त्या प्रमाणात भाषाभिवृद्धी घडून आली. राज्य कारभारात मराठी भाषेचा वापर करण्यास त्यांनी प्रोत्साहन दिले. अशा या थोर, अलौकिक युगधुरंधर, रयतेच्या राजाचा वयाच्या ५२व्या वर्षी विषमज्वराचे निमित्त होऊन ३ एप्रिल१६८० रोजी हनुमान जयंती, चैत्रशुध्द पौर्णिमेच्या दिवशी रायगडावर मृत्यू झाला. महाराजांच्या अष्ट प्रधानांपैकी एक , रामचंद्र नीळकंठ बावडेकर उर्फ रामचंद्र अमात्य यांनी 'आज्ञापत्र' हा मराठेशाहीतील, विशेषतः शिव छत्रपती यांच्या राजणीतीवर चिकित्सात्मक ग्रँथ लिहिला आहे. शिवजयंतीनिमित्त ,शिवाजी महाराजांना मानाचा मुजरा. संदर्भ:(१) मराठयांच्या इतिहासाची साधने,संपादक - वि. का. राजवाडे, प्रकाशक - राजवाडे संशोधन मंडळ, धुळे(२) शिवचरित्र साहित्य खंड, भारत इतिहास संशोधन मंडळ, पुणे(३) यादवकालीन मराठी भाषा - डॉं. शं. गो. तूळपुळे - व्हीनस प्रकाशन ,पुणे (४) वृत्तपत्रांचा इतिहास - वि. कृ. जोशी, रा. के. लेले, युगवाणी प्रकाशन, मुंबई ( ५ ) मराठेशाहीतील पत्ररूप गद्य - डॉं. सुधाकर पवार, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

**- देवेंद्र भुजबळ**

# स्फूर्तीचा जिवंत झरा; छत्रपती शिवाजी महाराज

**हिंदवी** स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज या विश्वातील एक अद्वितीय जाणते राजे होते.

छत्रपती शिवाजी महाराजांनी शून्यातून स्वराज्य निर्माण केले, अशक्य होते ते शक्य करून दाखविले, असाध्य ते साध्य करून दाखविल केलेला प्रण सिद्धीस नेला व माँ साहेबांचे स्वप्न पूर्णत्वास नेले. म्हणून शिवरायांचे जीवन चरित्र पुन्हा - पुन्हा ऐकावे वाटते, पुन्हा-पुन्हा वाचावे वाटते, त्यांच्या चरित्रातून आजही स्फुर्ती, प्रेरणा व प्रोत्साहन मिळते, जागतिक कीर्तीचे थोर युरोपियन इतिहासकार एडॉल्फ टायबर्न म्हणतात की, 'जर छत्रपती शिवाजी महाराज आमच्या देशात जन्मले असते तर त्यांच्या कार्याचा अक्षय ठेवा डोक्यावर ठेऊन आम्ही आनंदाने नाचलो असतो,' अमेरिकन इतिहासकार म्हणतात, 'छत्रपती शिवाजी महाराज जर आमच्या देशात घडले असते तर कथा लिहीताना आम्हाला, हर्क्युलीस सारखे काल्पनिक पात्र तयार करावे लागले नसते 'जगातील अनेक थोर व्यक्तींना शिवचरित्रातून प्रेरणा व प्रोत्साहन मिळाले व मिळत आहे, आजही 'छत्रपती शिवाजी महाराज की जय'किंवा'जय भवानी - जय शिवाजी'म्हटले की अंगात रक्त सळसळत हेच खरे स्फूर्ती चे जिवंत स्वरूप आहे,शिवरायांच्या जीवन चरित्रातून या जगतातील लाखो -करोडो लोकांनी स्फूर्ती घेतली आहे, म्हणूनच तर छत्रपती शिवरायांना 'स्फूर्तीचा जिवंत झरा' म्हणतात,

त्यांची रयतेच्या सुख ,समाधानासाठीची तळमळ,त्यांची प्रखर मातृपितृ भक्ती, साधू -संतांचा मान, सन्मान, आदर व त्यानी सर्व धार्मिक स्थळांचा व सर्व जाती धर्मियांचा बाळगलेला आदर आजही संपूर्ण मानव जातीला अभिमान वाटावा असा आहे. शिवराय स्वदेशाभिमान छत्रपती होते. प्रत्येकाला आपल्या धर्माप्रमाणे आचरण ठेवता यावे, सर्वांना सुखासमाधानाने जगता यावे ,मराठी भाषेला ,स्वधर्माला मान मिळावा, यासाठी शिवरायांनी बलाढ्य शत्रूशी झुंज दिली व स्वराज्य स्थापन केले, स्वदेश, स्वधर्म व स्वभाषा, यांच्या उत्कर्षासाठी ते आयुष्यभर झटत राहिले, आणि अखेर यशस्वी झाले. शिवरायांना मायबोलीचा अभिमान होता. राज्यकारभारात मराठी शब्द वापरता यावेत यासाठी त्यांनी राज्यव्यवहार कोश हा ग्रंथ तयार करून घेतला, हिंदवी स्वराज्य हे शिवरायांचे स्वप्न होते, हिंदवी म्हणजे हिंदुस्थानात राहणारे मग ते कोणत्याही धर्म, जात व संप्रदायाचे असोत त्यांचे राज्य ते हिंदवी राज्य असे ते मानत, छत्रपती शिवाजी महाराज अत्यंत दिलदार होते. स्वसराज्यच्या राज्यकारभारात सर्व जाती धर्म, पंथीयाना समान स्थान दिले. शिवाजी महाराजांच्या आरमार दलात दौलतखान, वकील काझी हैदर हे मुसलमान होते, लढाईत हाती लागलेल्या कोणत्याही महिला, मुली यांच्या अब्रूस त्यांनी कधीही धक्का लागू दिला नाही, आपल्या सेवकावर, आपल्या सरदारांवर महाराजांची अपार श्रद्धा, विश्वास व प्रेम होते. शिवरायांचे आठवावे रूप शिवरायांच्या समोर हिमालया एव्हढी संकटे होती. बलाढ्य शत्रूशी आपल्या तुटपुंज्या बळाने व साथीदारांनी झुंज द्यायची एवढे सोपे नव्हते परंतु आपल्या सहकार्यांना उत्साह देत,त्यांचा आत्मविश्वास वाढवत शत्रूंना चूकवत राजे आपल्या कुशल बुद्धीने लढले व यश मिळवले. शिवरायांच्या गनिमी काव्यापुढे भल्या -भल्यांची मती ठप्प होत असे, चौथाईचा हक्क हा शिरायांच्या मुत्सुद्धेगिरीचे उत्कृष्ट उदाहरण होय, सिद्धी पोर्तुगीज, इंग्रज यांच्या पासून स्वराज्याला धोका हे राजांनी ओळखले म्हणून त्यांनी आरमार दल ही उभारले होते. शेतकऱ्यांच्या हिताचा विचारही राजेंनी केला होता म्हणून छत्रपती शिवाजी महाराजाना शेतकऱ्यांचे राजेही म्हणतात, शिवाजी महाराजांचे कार्य म्हणजे 'स्फूर्तीचा जिवंत झरा'होय, कारण आजही त्यांच्या ध्येय, धोरण, नीती व प्रशासनास योग्य अशा बाबी उपयोगात येत आहे, त्यांच्या स्मृतींना विनम्र अभिवादन!

**- धोंडीरामसिंह ध राजपूत**

## जय भवानी-जय शिवाजी

**जय भवानी-जय शिवाजी**
**नारा आमचा छान**
**गातो शिवाचे गाणं**
**आम्ही गातो शिवाचे गाणं**

जिजाऊ आमची आई
जिजाऊ आमची माई
मुखात सदा आमच्या
जय भवानी आई --जय शिवाजी

**राजे शिवाजी आमचा राणा**
**राजे शिवाजी आमचा बाणा**
**मुखात आमच्या सदा**
**राजे शिवाजीचा गाणा**
**जय भवानी -जय शिवाजी**

शिवाजी आमची जान
शिवाजी आमचा प्राण
अभिमानाने गातो आम्ही
शिवाजींचे गाण। जय भवानी-

**-धोंडिरामसिंह ध राजपूत**

# छत्रपती शिवाजी महाराज : हिंदवी स्वराज्याचे संस्थापक आणि एक आदर्श शासनकर्ता !

**हिंदवी** साम्राज्याचे संस्थापक आणि एक आदर्श शासनकर्ता म्हणून ओळखले जाणारे छत्रपती शिवाजीराजे भोसले एक सर्वसमावेशक, सहिष्णू राजा म्हणून महाराष्ट्रात आणि इतरत्रही वंदिले जातात. शत्रूविरुद्ध लढ्याकरता महाराष्ट्रातल्या डोंगर-दऱ्यांमधे अनुकूल असलेली गनिमी काव्याची पद्धत वापरून त्यांनी तत्कालीन विजापूरची आदिलशाही, अहमदनगरची निजामशाही आणि बलाढ्य मुघल साम्राज्यशाही ह्यांच्याशी लढा दिला, आणि मराठी साम्राज्याचे बीजारोपण केले. आदिलशाही, निजामशाही आणि मुघलसाम्राज्य बलाढ्य असली तरी महाराष्ट्रात त्यांची सगळी भिस्त स्थानिक सरदारांवर आणि किल्लेदारांवर होती. ते सरदार / किल्लेदार जनतेवर अन्याय-अत्याचार करत असत. शिवाजी महाराजांनी त्या अन्याय-अत्याचारातून जनतेची सुटका केली, आणि उत्तम शासनाचे एक उदाहरण भावी राज्यकर्त्यांसमोर ठेवले. छत्रपतींच्या व्यक्तिमत्त्वाचा व कारकीर्दीचा आढावा घेण्याचा प्रयत्न केला असता काही गोष्टी समोर येतात. शौर्य, पराक्रम, शारीरिक सक्षमता, ध्येयवाद, कुशल संघटन, कडक व नियोजनबद्ध प्रशासन, मुत्सद्दीपणा, धाडस, द्रष्टेपणाष्ठ असे उच्च कोटीचे गुण महाराजांच्या व्यक्तिमत्त्वात एकवटलेले दिसतात.

छत्रपती शिवाजी महाराजांनी बालपणी, तरुणपणी शारीरिक सामर्थ्य वाढवण्यासाठी स्वत: कष्ट घेतले, पराक्रमासाठी शस्त्रांचा अभ्यास केला. महाराजांनी साध्या -भोळ्या मावळ्यांचे संघटन करून त्यांच्यामध्ये निष्ठा व ध्येयवाद जागृत केला, स्वत: शपथ घेऊन हिंदवी स्वराज्य स्थापनेच्या कार्यात स्वत:ला घट्टपणे बांधून घेतले; महत्त्वाचे गड-किल्ले जिंकले, नवे निर्माण केले, योग्य त्या वेळी आक्रमण किंवा गरज पडेल त्या वेळी तह हे सूत्र कमालीच्या हुशारीने वापरून अनेक शत्रूंना नामोहरम केलेच तसेच फितुरी, दगाबाजी, स्वराज्यांतर्गत कलहाचाही सामना केला. महाराजांनी आक्रमणाच्या वेळी गनिमी कावा तंत्राचा चातुर्याने वापर केला; सामान्य रयतेची व्यवस्था, शेतकऱ्यांची व्यवस्था, लढवय्या शूर सरदारांची व्यवस्था, धार्मिक स्थानांची व्यवस्थाष्ठ अशा अनेक व्यवस्था लावून दिल्या. सर्वांत महत्त्वाचे म्हणजे छत्रपतींनी अष्टप्रधान मंडळाची स्थापना करून हिंदवी स्वराज्याच्या राज्यकारभाराची परिपूर्ण व्यवस्था निर्माण केली. महाराजांनी राजभाषा विकसित करण्याचा गांभीर्यपूर्वक प्रयत्न केला; विविध कलांना राजाश्रय दिला तसेच खचलेल्या, पिचलेल्या रयतेच्या मनामध्ये स्वाभिमानाचा, पराक्रमाचा, स्वराज्य निष्ठेचा हुंकार जागृत केला. या सर्व गोष्टी महाराजांनी साध्य केल्या अवघ्या ५० वर्षांच्या आयुष्यात !

वयाच्या केवळ १६ व्या वर्षी छत्रपती शिवरायांनी स्वराज्याचे तोरण बांधले. सवंगड्यांसह हिंदवी स्वराज्याची शपथ घेतली. मूठभर मावळ्यांमध्ये धर्मप्रेम जागृत करून त्यांना लढायला शिकवले आणि स्वराज्याची संकल्पना दिली. हिंदवी स्वराज्यासाठी मूठभर मावळ्यांनी जिवाची पर्वा न करता स्वतःला झोकून दिले. पाच पातशाह्यांच्या विरोधात लढत एक एक प्रदेश जिंकला. केवळ ५० वर्षांच्या कालावधीत विजापूर आणि दिल्ली या राजसत्तांना पाणी पाजले. खिस्ताब्द १६७४ मध्ये त्यांचे गुरु समर्थ रामदास स्वामी यांच्या मार्गदर्शनानुसार महाराजांनी हिंदवी स्वराज्य स्थापनेची घोषणा करून स्वतःला राज्याभिषेक करवून घेतला आणि हिंदु धर्माला राजसिंहासन प्राप्त करून दिले. छत्रपती शिवाजी महाराजांना आपले भाग्यविधाते म्हणून स्वराज्याची जनता त्यांना पाहू लागली. काही जण, तर त्यांना हिंदूपती पातशहा म्हणू लागले. शिवरायांनी वेदांचे, पुराणांचे, देवळांचे रक्षण केले आणि जीभेवर रामनाम राखून धरले.

शिवजयंतीनिमित्त महाराजांच्या कार्यातून 'हिंदु राष्ट्र' निर्मितीची प्रेरणा घेऊया. छत्रपती महाराजांचा इतिहास प्रेरणादायी आहे. हिंदूंनी त्यांचे गुण आत्मसात करायला हवेत. हीच शिवरायांना त्यांच्या जन्मदिनी खरी आदरांजली ठरेल.

**संकलक : कु. प्रियांका लोणे**

सोमवार खेरीज दररोज प्रसिद्ध होणारे दैनिक
लोकविजय
(आरएनआय रजि. नं. ११४२१/६१)
हे पत्रक मुद्रक, प्रकाशक श्री. राजेंद्र पांडुरंग रांजणीकर यांनी सोलापूर तरूणभारत मिडिया लिमिटेड, रेल्वेस्टेशन एमआयडीसी स्टेशनरोड औरंगाबाद येथे छापून दैनिक लोकविजय कार्यालय, ३, चेतनानगर, (माणिक आर्केडच्या पाठीमागे,) औरंगाबाद येथे प्रसिद्ध केले.
: संपादक :
राजेंद्र पांडुरंग रांजणीकर
मो. :९३२५२११९०१, ९५१८७६६३९५
e-mail:lokvijay2000@yahoo.co.in

या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या, फीचर, लेख, कथा यांच्या मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही.
बातम्या व इतर मजकूराबद्दल काही वाद निर्माण झाल्यास त्याची सर्व जबाबदारी संबंधीत वार्ताहार, प्रतिनिधी, उपसंपादक, वृत्तसंपादक, यांची राहील. संपादक, मालक, प्रकाशक, मुद्रक त्याला जबाबदार राहणार नाहीत.
(औरंगाबाद न्यायकक्षेत)

# पोलिस ठाण्याच्या बँक खात्यातून ३ लाख गायब

## सहायक फौजदारावर गुन्हा दाखल, परस्पर पैसे काढून हिशेब दिलाच नाही

छत्रपती संभाजीनगर दि.१८ (प्रतिनिधी)- पोलिस ठाण्यात मोहरील पदावर तैनात असलेल्या सहाय्यक फौजदाराने परस्पर तीन लाख रूपये बँकेतून काढले. मात्र, या पैशांच्या खर्चाचा हिशोब दिलाच नाही. तसेच बँकेतून काढलेल्या शासकीय निधीचा अपहार केला. या प्रकरणी पोलिस ठाण्याचे तत्कालीन मोहरील सहायक फौजदार रामदास संताराम गायकवाड (वय ५४) यांच्या विरोधात छावणी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

या प्रकरणी पोलिस निरीक्षक डॉ. राजेंद्र नारायण होळकर यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, छावणी पोलिस ठाण्यातील तत्कालीन मोहरील रामदास संताराम गायकवाड यांच्याकडे पोलिसांचा तपास फंड, पोलिस मेन्टन्स, लाईट बील, अशा कामाचा हिशोब ठेवण्याची जबाबदारी होती. असा हिशोब संभाळणाऱ्याला पोलिस खात्यात मोहरील असे संबोधण्यात येते. गायकवाड यांनी ३० एप्रिल २०२१ पासून एसबीआय बँक खात्यातून शासकीय निधी काढून घेतला. निधीची नोंद पोलिस ठाण्यात न करता परस्पर रक्कम हडप केली व शासनाची दिशाभूल करुन फसवणूक केली. शासकीय रकमेचा हिशेब न ठेवता अभिलेखामध्ये चुकीची नोंद करुन शासनाची दिशाभूल करुन फसवणूक करण्यात आली.

तीन लाख ४ हजार रूपये ही रक्कम गायकवाड यांनी स्वतःच्या फायद्यासाठी तत्कालीन पोलिस निरिक्षक यांचा विश्वास संपादन करून त्यांच्याकडून ३ लाखांच्या चेकवर बँकेतून रक्कम काढली आणि त्याचा हिशोब दिलाच नाही. या प्रकरणात शासनाची फसवणूक केली. या प्रकरणी छावणी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास छावणी पोलिस ठाण्याचे पोलिस उपनिरीक्षक प्रमोद देवकते हे करत आहेत. तत्कालीन पोलिस आयुक्त यांनी मार्च २०२२ मध्ये छावणी पोलिस ठाण्याचा दौरा केला होता. या पाहणीत कॅशबुक तपासले असता, या जमा खर्चाच्या हिशेबात तफावत आढळून आले. या प्रकारानंतर तत्कालीन मोहरील रामदार गायकवाड यांना जबाबदार धरून प्राथमिक चौकशी व त्यानंतर विभागीय चौकशी चालू करण्यात आली.

पोलिस ठाण्याचा मेन्टनन्स, तपासासाठी लागणारा निधी, लाईट बिल असा खर्च मोहरील फंडातून केला जातो. तत्कालीन मोहरील रामदास गायकवाड यांनी ३० एप्रिल २०२१ ला बँकेतून चेकद्वारे ३ लाख ४ हजार ८१९ रूपये रोखीने काढले. मात्र ही रक्कम कोणास अदा केली. याची नोंद कॅशबुकमध्ये नव्हती. त्याबाबत अधिक तपासणी केली असता, व्हॉऊचरवर ओव्हर राईटिंग केल्याचा प्रकार समोर आला.

## स्नेहसंमेलनातून विद्यार्थ्यांच्या अंगी असलेल्या विविध कलागुणांचा आविष्कार होय-माजी शिक्षणाधिकारी धोंडीरामसिंह राजपूत



वैजापूर दि.१८ (प्रतिनिधी)- शाळा व महाविद्यालयातील विद्यार्थी स्नेहसंमेलन म्हणजे विद्यार्थ्यांच्या अंगी असलेल्या कला गुणांचा नवं आविष्कार होय,विद्यार्थ्यांचा संख्यात्मक विकास जेव्हढा महत्वाचा आहे त्यापेक्षा गुणात्मक व कौशल्यत्मक विकास ही महत्वाचा आहे,असे प्रतिपादन माजी शिक्षणाधिकारी धोंडीरामसिंह राजपूत यांनी तालुक्यातील भगगाव येथील रोम्बस प्रायमरी इंग्लिश स्कुल द्वारा आयोजित वार्षिक स्नेहसंमेलन सोहळ्यात केले.

प्रास्ताविक विद्यालयाच्या व्यवस्थापिका सौ,प्रणिता साईनाथ पेहरे यांनी केले तर डॉ. साईनाथ पेहरे यांनी आलेल्या सर्व मान्यवरांचे शाल देऊन स्वागत केले. या प्रसंगी पंचायत समितीचे माजी सभापती तथा उपजिल्हाप्रमुख बाबासाहब जगताप यांनी विशद केले की आ.बोरनारे आपल्या निधीतून या शाळेच्या परिसरात पेवर ब्लॉक बसवून देतील. आ.रमेश पा.बोरनारे यांचे प्रतिनिधी त्यांचे बंधू संजय बोरनारे, शिवसेना तालुका प्रमुख राजेंद्र पाटील साळुंके, गट नेते तथा ओबीसी जिल्हा प्रमुख दशरथ बनकर, नगरसेवक ज्ञानेश्वर माऊली टेके, श्रीकांत साळुंके, दीपक भैया साळुंके, देवगिरी हॉस्पिटलचे प्रसिद्ध हृदय रोग तज्ञ डॉ.गणेश अग्रवाल, वैजापूरचे सोनोग्राफी तज्ञ डॉ.सचिन धोंडीरामसिंह राजपूत, महानुभाव पंथाच्या दीदी, पानवचे सामाजिक कार्यकर्ते अमोल बावचे, भगगाव चेमाजी सरपंच सुखदेव पा.बावचे, सरपंच अशोक अण्णा जगताप, उपसरपंच शरद काळे, भगगाव येथील हरिभाऊ जगताप, अण्णा जगताप,योगेश गायकवाड, आप्पासाहेब पवार,श्रीमती पल्लवी जगताप, श्रीमती शांताबाई शेलार, मंदाबाई जगताप,विमल गोरे,श्रीमती कमल गायकवाड, शरद जुंधारे, श्रीमती रहाटवळ ताई, माजी सरपंच प्रवीण तांबे व पालक वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते. शालेय विद्यार्थ्यांनी आपल्या कला, गुण, कौशल्य, नृत्य यातून विविध गुंणदर्शन सादर केले. सूत्र संचलन शिक्षिका निशा पवार यांनी केले आभार प्रणिता पेहरे यांनी मानले.

## केंद्रीय सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांप्रमाणे राज्य सेवा निवृत्त कर्मचाऱ्यांना ६५-७०-७५ वयोगटाप्रमाणे वाढ द्या, आरोग्य सुविधा द्या, वैद्यकीय भत्ता एक हजार रुपये वाढ द्या; वैजापूरात सेवानिवृतांची एकमुखी मागणी






वैजापूर दि.१८ (प्रतिनिधी)- केंद्र सरकारने ज्या प्रमाणे त्यांच्या सेवा निवृत्त कर्मचाऱ्यांना ६५ वर्ष वय पांच टक्के वाढ,७० वर्ष दहा टक्के वाढ, ७५वर्ष पंधरा टक्के वाढ देत आहे. केंद्रीय सेवा निवृत्त कर्मचाऱ्यांना वैद्यकीय उपचारासाठी दर महा एक हजार रुपये केंद्र सरकार देते. यांच धर्तीवर महाराष्ट्र राज्यातील सेवा निवृत्त कर्मचाऱ्यांना ही द्या सवलती द्या अशी एकमुखी मागणी वैजापूर येथील 'पेंशनर्स डे'निमित्त आयोजित मेळाव्यात पेंशनर्स नी केली,जिल्हा परिषद शिक्षकांचे निवृती वेतन शासकीय कोषागारातून करा, बँकेने पेंशनर्स ची किरकोळ कामासाठी अडवणूक करू नये, कार्यालयीन अधिकारी व कर्मचारी यांनी पेन्शन संबंधी माहिती पेंशनर्स ना सन्मानपूर्वक द्यावी त्यांची अडवणूक करू नये, अशा विविध मागण्या शासनाकडे करण्याचे ठराव या 'पेंशनर्स डे'मेळाव्यात घेण्यात आले.

कार्यक्रम अध्यक्षस्थानी शाखेचे कार्याध्यक्ष पी.डी.शेटे होते. संघटनात्मक उत्कृष्ट कार्य केल्या बद्धल सेवा निवृत्त तलाठी अशोक आप्पा पवार खंडाळकर याना सेवा गौरव पुरस्कार देऊन त्यांचा यथोचित गौरव करण्यात आला. उपाध्यक्ष टी.पी.शिरोडे, सचिव उत्तमराव साळुंके, सुदाम गोधळे अप्पा, कृष्णराव कांबळे यांनी मनोगत व्यक्त केले. आरंभी छत्रपती शिवाजी महाराज,डॉ, बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याना पुष्पहार अर्पण करून व कै.डॉ.नाकारा, कै.हरिशचंद्रराव जोशी यांना अभिवादन केले. प्रास्ताविक शाखेचे सचिव धोंडीराम राजपूत यांनी केले. या प्रसंगी बी.बी. बाविस्कर, बा.बा.त्रिभुवन, प्रा.डी.एस.गायकवाड, गोकुलसिंह राजपूत, दिलीप अनर्थे, श्रीमती कुसुमबाई अनर्थे, कमळ गायकवाड, सौ. मंगला सरोदे, सोन्याबापू गावडे, पी.ए. बोडखे, पुंडलिक चव्हाण, श्रीपाद देशपांडे, शेख शाहूर, सुरेश संत, अंकुश मगर, बबनराव क्षीरसागर, रामदास रत्नपारखी, सुभाष चाफेकर इत्यादी मोठ्या संख्येने आलेले पेंशनर्सची उपस्थिती होते. शेवटी अण्णासाहेब शेळके,यांनी आभार मानले.

## ६६ जणांवर वीजचोरीचे गुन्हे दाखल

छत्रपती संभाजीनगर दि.१८ (प्रतिनिधी)- तालुक्यातील महावितरणच्या हर्सूल, सावंगी, माळीवाडा तसेच वाळूज महानगर शाखेतील तब्बल ६६ वीजचोरांवर गेल्या दोन दिवसांत छावणी व चिकलठाणा ग्रामीण पोलिस ठाण्यात गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

महावितरणचे मुख्य अभियंता डॉ.मुरहरी केळे यांच्या आदेशाने अधीक्षक अभियंता प्रवीण दरोली, कार्यकारी अभियंता शैलेश कलंत्री यांच्या मार्गदर्शनाखाली नोव्हेंबर ते जानेवारी या महिन्यांमध्ये वीजचोरीविरोधात तालुक्यातील विविध गावांत धडक मोहीम राबवण्यात आली. वडगाव कोल्हाटी, करोडी, सावंगी, नायगाव, पोखरी येथील घरगुती व व्यावसायिक वापरासाठी मीटरमध्ये फेरफार व विद्युत वाहिनीवर आकडे टाकून ३७७१५ युनिटची वीज चोरी करणाऱ्या एकूण ६६ लोकांनी पैसे न भरल्यामुळे त्यांच्यावर गुन्हे दाखल करण्यात आल्याची माहिती ग्रामीण - १ उपविभागाचे उपकार्यकारी अभियंता प्रवीण पवार यांनी दिली. या मोहिमेत शाखा अभियंता फिरोज शेख, धनंजय बाणेदार, गोविंद दुसंगे, हकीम व नरेंद्र शिंदे यांच्यासह कर्मचारी सहभागी झाले होते.

## वैजापूरात श्री.वीरभद्र महाराज यात्रेनिमित्त पालखी मिरवणूक, महाप्रसाद व सांस्कृतिक कार्यक्रमात उत्साह



वैजापूर दि.१८ (प्रतिनिधी)- शहराचे दैवत असलेले वीरभद्र महाराज यांच्या यात्रेनिमित्त वैजापूरात शनिवार (ता.१७) रोजी सकाळी नऊ वाजता पालखी मिरवणूक ,छडी मिरवणूक,व प्रतिमा मिरवणूक काढण्यात आली. यावर्षी प्रथमतःच मिरवणुकीत घोड्यांचा समावेश करण्यात आला होता.

डीजेच्या संगीत व तालावर घोडे आकर्षक नृत्य करून सर्वांचे लक्ष वेधत होते. सामाजिक कार्यकर्ते तथा स्वच्छतादूत धोंडीरामसिंह राजपूत व भीकाभाऊ नाईकवाडी, युवा सेनेचे श्रीकांत साळुंके यांनी संकट मोचन हनुमान मंदिरात पालखी पूजन केले. गुरू चंद्रकांत कुलकर्णी यांनी ही पूजन केले. यानिमित्ताने येवला स्त्यावर असलेल्या वीरभद्र मंदिरावर विद्युत रोषणाई करण्यात आली सायंकाळी रोहिदास भगत गावडे यांनी चालत आलेली परंपरा राखत बारा गाड्या ओढल्या असून ,सायंकाळी सांस्कृतिक कार्यक्रम व महाप्रसाद वाटप ही करण्यात आले आहे. या प्रसंगी वैजापूरचे माजी आ.भाऊसाहेब पा.चिकट गावकर, डॉ. दिनेश परदेशी, बाबासाहेब जगताप, राजेंद्र पा.साळुंके, संजय बोरनारे, संकेत वाणी, बजरंग मगर, प्रशांत शिंदे, ज्ञानेश्वर माऊली टेके, रामकीसन जोरे पाटील, दिगंबर खंडागळे, शंकर मुळे, परशराम आलूले यांचे शाल व श्रीफळ देऊन ललित गावडे, मनोज गावडे, गोरख गावडे, रवी गावडे, श्याम गावडे,नवनाथ गावडे यांनी स्वागत केले. उत्सव समितीचे सर्व गावडे सदस्य कार्यक्रम यशस्वी साठी परिश्रम घेतले आहेत,सोन्याबापू गावडे, बाबुराव गावडे,जेष्ठ पत्रकार घनश्याम वाणी, सेवा निवृत्त पोलीस अधिकारी सोपानराव निकम,रामदास भगत,यांनी सहभाग नोंदवला..

## शहरात वाढवलेला मालमत्ता कर रद्द करा; भाजपचे मनपा आयुक्तांना निवेदन



छत्रपती संभाजीनगर दि.१८ (प्रतिनिधी)- येथील म.न.पा च्या वतीने गुन्ठेवारी कर हा दुप्पट वाढवण्यात आलेला आहे. तसेच मालमत्ता कर हा ०१ एप्रिल पासुन घरगुती मालमत्तेसाठी ६५ इ व व्यवसायिक मालमत्तेसाठी १२८टक्के ने कर वाढवण्याचा निर्णय घेण्यात आला. त्या अनुषंगाने आज भारतीय जनता पार्टीचे शिष्ठमंडळ आयुक्तांना भेटुन सदर गुन्ठेवारी कर ५०टक्के करावा व मालमत्ता कर पुर्वीच्या दराने आकारण्यात यावा असे निवेदन देवुन चर्चा करण्यात आली. त्यामुळे मा.आयुक्त यांनी शिष्ठमंडळाच्या मागणीचा विचार करुन गुन्ठेवारी कर ५०टक्के ने कमी करण्याचे मान्य केले व मालमत्ता कर कमी करण्याचा पुर्नविचार करण्याचे मान्य केले असे शिरीष बोराळकर, शहर जिल्हा अध्यक्ष भाजपा यांनी सांगितले. यावेळी प्रमोद राठोड, अॅड माधुरीताई अदवंत, दिलीप थोरात, शिवाजी दांडगे, नितिन चित्ते, राजगौरव वानखेडे, सुरेद्र कुलकर्णी, शहर सरचिटणीस हर्षवर्धन कराड, शहर सरचिटणीस दिपक ढाकणे, शहर सचिव अॅड ताराचंद गायकवाड, अमित देशपांडे, बंटी चावरिया, संजय फतेलष्कर, अमोल झळके, भाजपा अल्पसंख्याक मोर्चा शहराध्यक्ष सलीम चिस्ती यांच्यासह भारतीय जनता पार्टीचे प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते.

